# जाहिरात

## जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नांदेड

## तदर्थ वैद्यकीय अधिकारी(पदव्युत्तर पदवी/पदविका अर्हता धारक) गट अ यांची कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याबाबत

मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या निवड समितीव्दारे आरोग्य सेवा, लातूर मंडळांतर्गत असलेल्या नांदेड जिल्हयातील आरोग्य विभाग महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा (गट अ) यांची १४रिक्त पदे तदर्थ वैद्यकिय अधिकारी म्हणून कंत्राटी पध्दतीने फक्त ११ महिन्यांचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात थेट मुलाखतीद्वारे खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून भरावयाची आहेत.

| अक्र | वैद्यकिय अधिकारी (विशेषज्ञ) | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | स्त्रीरोग तज्ञ | ५ |
| २ | बालरोग तज्ञ | ४ |
| ३ | भिषक | १ |
| ४ | शल्य चिकित्सक | १ |
| ५ | भुलतज्ञ | १ |
| ६ | अस्थिव्यंग तज्ञ | २ |
| | **एकुण** | **१४** |

१. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती ११ महिन्यांसाठी किंवा सदर पदावर नियमित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील.

२. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमित वैद्यकिय अधिकाऱ्यासारखे म.ना.से. (रजा) नियम लागू राहणार नाही. तसेच ते विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतीही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाही. त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

३. सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने त्यांना सदर पदावर भविष्यात कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांना धारणाधिकार असणार नाही .

४. कंत्राटी तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची भविष्यात विहित मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडून दिली जाणार नाही.

५. केवळ तात्पुरती कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची कंत्राटी सेवा अर्हताकारी सेवा म्हणून गणण्यात येणार नाही किंवा सेवा ज्येष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

६. निवड झालेल्या तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांना मुख्यालयात राहणे बंधनकारक आहे. तसेच त्यांचे बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य आहे.

७. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.

८. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना सेवाकाळात सेवामुक्त व्हावयाचे असल्यास त्यांना एक महिन्याची पुर्व नोटीस किंवा एक महिन्याचे मानधन भरुन कार्यमुक्त होता येईल.

९. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. संआसे-२०२२/प्रक्र १९२/सेवा-१(शिकाना) दि.२७/१२/२०२२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे आदिवासी व दुर्गम भागात काम करणाऱ्या पदव्युत्तर पदवी/पदविका अर्हता धारक विशेषज्ञ. पात्रताधारकांना दरमहा रु.९०,०००/- व इतर भागासाठी रु.८५,०००/- इतके एकत्रित मानधन दिले जाईल.

१०. कंत्राटी स्वरुपात सेवा असल्याने संबंधित पदावर कायम करण्याचा अधिकार त्यांना सांगता येणार नाही,तसेच त्या अनुषंगाने कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

उमेदवारांनी मुलाखतीस येताना सोबत विशेषज्ञ पदव्युत्तर पदवी/पदविका असल्यास त्यांचे सर्व वर्षांचे गुणपत्रिका, पदविका/पदवी प्रमाणपत्र, =१वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, नुतणीकरण प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, अलिकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ व छायांकित प्रतींचा एक संच, फोटो असलेले ओळखपत्र इ. सोबत घेऊन येणे आवश्यक आहे. उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच अनाधिकृत गैरहजर असलेल्या/संपामध्ये सहभागी असलेले/शासन सेवेत शिस्तभंग कार्यवाहीकरीता काढून टाकलेले वैद्यकिय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही. **थेट** मुलाखातीकरीता हजर उमेदवारांची संख्या जास्त असल्यास रिक्त पदांच्या संख्येनुसार १:५ प्रमाणे गुणानुक्रमे प्रथम असणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीस बोलविणेत येईल. सदर भरतीबाबतचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीकडे राखून ठेवणे आलेले आहेत.

**अ) शैक्षणिक अर्हता :- विशेषज्ञ पदव्युत्तर पदवी/पदविका अर्हताधारक**

**ब) थेट मुलाखतीचे ठिकाण व दिनांक :- जिल्हा शल्यचिकित्सक कायालय, नांदेड येथे दि.०८/०९/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता**

**क) संपर्क क्रमांक :- ०२४६२ २४५५१६ E-mail :- cs_nanded@rediffmail.com**

**स्वाक्षरीत**

**सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**जिल्हास्तरीय निवड समिती, व्दारा जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, नांदेड**

---

**अर्जाचा नमुना**

कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणेसाठी पात्र व इच्छुक उमेदवाराने भरावयाचा अर्ज

१) उमेदवाराचे संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :-

२) जन्मतारीख :- अर्जाच्या दिनांकास वय:-

(दिनांक) (महिना) (वर्ष)

३) शैक्षणीक अर्हता :- पदव्युत्तर पदवी/पदविका/एम.बी.बी.एस.

४) एम.बी.बी.एस. उत्तीर्ण केलेल्या महाविद्यालयाचे नाव :-

५) महाराष्ट्र वैद्यकिय परिषद (एम.एम.सी.) येथे कायम नोंदणी केल्याचा दिनांक:-

६) पदव्युत्तर पदवी/पदविका अर्हताधारक असल्यास विषय :-

७) पदव्युत्तर पदवी/पदविका परिक्षेतील गुण खालीलप्रमाणे –

| अ. क्र. | वर्ष | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | प्रयत्न संख्या | पैकी गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष | | | | | |
| २ | व्दितीय वर्ष | | | | | |
| ३ | तृतीय वर्ष – १ | | | | | |
| ४ | तृतीय वर्ष – २ | | | | | |
| ५ | तृतीय वर्षाचे एकूण | | | | | |

अनुभवाचा तपशिल

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नाव | पद | एकूण कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

८) तात्पुरत्या पत्रव्यवहाराचा पत्ता, संपर्क क्रमांक व ई-मेल आयडी :-

९) कायमचा पत्ता :-

१०) बंधपत्रित/अबंधपत्रित (बंधपत्रित असल्यास कॉलेजचे पत्र व परिमंडळाचे ना हरकत पत्र जोडावे.)

वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे. मी प्रमाणित करतो/करते कि, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कार्यवाहीस पात्र व बांधील राहीन.

**दिनांकः-   /   /२०२३**

**ठिकाणः-**

**उमेदवाराची स्वाक्षरी**

**(उमेदवाराचे संपूर्ण नाव)**

खालील प्रमाणपत्रे साक्षांकित करुन अर्जासोबत जोडलेल्या आहेत.

१. जन्मतारखेचा दाखला/ १० वी पास प्रमाणपत्र
२. एम.बी.बी.एस. उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रिका
३. पदव्युत्तर पदवी/पदविका गुणपत्रिका व प्रमाणपत्र
४. महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे ( Maharashtra Medical Council ) / महाराष्ट्र भारतीय चिकित्सा परिषद (Maharashtra Council Of Indian Medicine ) यांचे कायम नोंदणी व नुतणीकरण केल्याचे प्रमाणपत्र (एम.एम.सी.)
५. आंतरवासियता प्रमाणपत्र
६. अनुभव असल्यास दाखला - प्रमाणपत्र
७. ॲटेम्प्ट सर्टिफिकेट